प्रकरण चौथे

# भाषिक विशेषांचा तुलनात्मक विचार

# प्रकरण चौथे

## भाषिक विशेषांचा तुलनात्मक विचार

प्रत्येक साहित्यकृतीत भाषाशैली हा घटक महत्त्वपूर्ण मानला जातो. तसेच भाषिक विशेषही साहित्यकृतीत वाचकाचे लक्ष वेधून घेऊ शकतात. विशेषतः ग्रामीण/दलित/प्रादेशिक अशा साहित्यकृतीत भाषिक विशेष त्या कलाकृतीचे एक खास वैशिष्ट्य ठरते. ग्रामीण, दलित व प्रादेशिक स्वरूपाचे लेखन करणाऱ्या साहित्यिकाची शैली लोक संस्कृतीच्या अंगाने विकसित झालेली असते. म्हणून लेखकाची भाषाशैली महत्त्वपूर्ण ठरते. 'अक्करमाशी' व 'कोल्हाट्याचं पोर' या दोन दलित आत्मकथनामधील भाषा वैशिष्ट्यपूर्ण आहे. या प्रकरणात त्यांची तुलनात्मक चर्चा करावयाची आहे. मनुष्य प्राणी हा अनेक वैशिष्ट्यांनी इतर प्राण्यांहून वेगळा आणि श्रेष्ठ ठरला आहे. त्याच्या अनेक वैशिष्ट्यांपैकी त्याची संभाषण करण्याची क्षमता हे एक वैशिष्ट्य होय. प्रस्तुत संशोधनात 'आत्मकथन' केंद्रभूत आहे. त्यातील निवेदन प्रथमपुरूषी एकवचनी असले तरी त्यामध्ये अनेक व्यक्तिरेखा आहेत. आत्मकथा प्रसंगांनी व संवादाने विकास पावते. संवादशैलीत भाषा व स्वभावदर्शन वैशिष्ट्यपूर्ण व लक्षवेधक ठरते.

मनुष्याला आपले विचार-भावना-कल्पना स्पष्टपणे व्यक्त करण्यास वाणी लाभलेली आहे. प्रत्येकाला आपापल्या भावनांचा व्यवहारी जीवनात वापर करण्यास भाषा उपलब्ध झाली आहे. कोणतीही वाङ्मयकृतीचे कलात्मक स्वरूप त्यातील आशय आणि अभिव्यक्ती प्रस्थापित होते. कलाकृतीचा आशय हा तिच्या भाषाशैलीचे स्वरूप निश्चित करतो. आशय आणि अभिव्यक्तीचे नाविन्य महत्त्वाचे ठरते. दलित 'स्वकथना'मधील नवा आशय मांडण्यासाठी लेखक बोलीभाषा स्वीकारतात. पण याविषयी श्री.म. माटे लिहितात - ''महार मांगादी तळच्या समाजातील माणसे शिक्षित होतील आणि आपले अनुभव साहित्यातून सांगू लागतील तेव्हा मराठी साहित्य अधिक पुष्ट, प्रातिनिधिक आणि वास्तव झालेले असेल.'' (भाषावृद्धीची सामाजिक दृष्टी)[१] श्री. म. माटे यांच्या भाकितानंतर अर्धशतकातच मराठी साहित्याला दलित साहित्याने त्या जिवंत भाषेचे प्रत्यंतर दिले.

प्रत्येक जातीधर्माची ठराविक अशी बोलीभाषा असते. भाषा ही प्रत्येक पंधरा मैलांवर बदलते. तिच्यावर त्या-त्या परिस्थितीचा, परिसराचा, लोकांचा प्रभाव दिसून येतो. भाषिक व्यवहार तीन स्तरांमध्ये विभागला आहे. १) ग्रांथिक भाषा, २) बोली भाषा, ३) प्रादेशिक भाषा यापैकी प्रमाणित म्हणजेच ग्रांथिक भाषा लेखनासाठी मान्य केलेली आहे.

याविषयी डॉ. नागनाथ कोतापल्ले यांनी 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध' या ग्रंथात म्हटले आहे -

''ग्रामीण समाजाची एक पातळी येथे जाणवते. या समाजात दलित शोषितांची बेटे इतस्ततः विखुरलेली आढळतात. त्या समाजाची एक वेगळी जीवनपद्धती, बोलीभाषा येथे आढळते. या समाजातील पिढी जशी शिक्षित होत जाईल तसतशी त्या जीवनाची चित्रणे जीवनाच्या पार्श्वभूमीसह साहित्यात येणारच.''[२]

'अक्करमाशी'चे लेखक शरणकुमार लिंबाळे यांच्या आत्मकथनातील भाषाही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे दुभंगलेली आढळते. सीमा प्रदेशात म्हणजेच कर्नाटकच्या हद्दीत त्यांचे गाव असल्याने तिथे बोलल्या जाणाऱ्या महारी मराठीचा वापर लेखक सोलापूरला शिकायला जाईपर्यंतच्या कालावधीतील कथनात करताना आढळतो. तर ग्रांथिक भाषा आणि महारी बोली यांच्या मिश्रणातून उरलेल्या भागाचे पुढे निवेदन आहे. या प्रारंभीच्या आणि नंतरच्या भाषेतून सांस्कृतिक पार्श्वभूमीतील प्रतिमासृष्टी येते. उदा. ''मला गुरूजीच्या चपला रामाच्या पादुकावनी वाटायच्या.'' (पृष्ठ ४)

मसामायला नवऱ्याने सोडल्यानंतर तिची दिशाहीन अवस्था वर्णन करताना लेखक लिंबाळे लिहितात, ''दंडकारण्यात आसरा शोधणाऱ्या सीतेवानी ती भान इसरून चालल्ती.'' तर स्वतःच्या दुभंगलेल्या व्यक्तीमत्त्वाचे चित्रण करताना म्हणतात, ''म्या जरासंघासारखा. अर्धा गावात तर अर्धा गावाबाहीर फेकलेला.''

''कोल्हाट्याचं पोर'' मध्ये मेडिकलचे शिक्षण घेताना आर्थिक संकटात सापडलेल्या लेखकास (किशोर काळे) खासदार लोणीकर जेव्हा आर्थिक मदत करतात तेव्हा ''तेहतीस कोटी देव मी खासदार लोणीकरांच्या रूपात पहात होतो.'' अशा शब्दात आपली मनःस्थिती चित्रित करतो.

यावरून लक्षात येते की, ही दलित स्वकथने लेखकाचे वास्तव्य असलेल्या प्रदेशाच्या बोलीभाषेतून लिहिलेली आहेत. भाषा हे क्रांतीचे प्रभावी शस्त्र आहे. याची जाणीव शिक्षण घेतलेल्या लेखकांना आहे. भाषेचा समाज व्यवहाराशी, समाजाच्या आचार विचारांशी व नीती-नियमांशी घनिष्ट संबंध असतो. एखाद्या जमातीची संस्कृती व जीवनरीती भाषेनेच परिचित होत असते. "भाषेच्या स्तरावर भाषेच्या वापरावर सांस्कृतिक मूल्य ठरते. जमातीच्या संस्कृतीची ओळख भाषेमुळेच पटते."[३] 'अक्करमाशी' व 'कोल्हाट्याचं पोर' मधील भाषा व संवादशैली अभ्यासता आढळते की, या समाजाची जीवनशैलीच त्यांच्या भाषेतून प्रतिबिंबीत होते.

**<u>ग्रांथिक भाषा</u> :-**

लेखक शरणकुमार लिंबाळे म्हणतात, "मी जी अपेक्षा केली ती सार्थच म्हणावी लागेल. कारण दलित स्वकथनांनी मराठी भाषेचा शब्दकोष समृद्ध करून वेगवेगळ्या स्तरातील बोलीचे सौंदर्य वाढविले आहे. ग्रांथिक मराठी भाषा विकसित झाली पण तिच्यात कधी दलितांच्या जीवनातील शब्दांना प्रवेश मिळाला नव्हता. या स्वकथनांनी ज्या बोलीभाषेचा वापर केला त्या बोलींचा डौल त्या त्या लेखकाच्या संवेदनशील याच स्वभावाशी संवाद करणारी आहे."

लेखक प्र.ई सोनकांबळे यांनी 'आठवणींचे पक्षी' या आत्मकथनात मराठवाड्यातील अस्सल 'महारी भाषा' वापरली आहे. ही भाषा लेखकाच्या जीवनाची भाषा आहे. या आत्मकथनातील लेखकाची भाषा मराठवाड्यातील दगीर भागातील महारी बोलीचा परिणाम झाल्याने वास्तव व जिवंत वाटते. लेखक जसजसा शहरी होत गेला तसतशी त्याची शैली भाबडेपणाकडून गांभिर्याकडे वळलेली जाणवते. या स्वकथनातील शैलीचा तिरकसपणा आणि उपरोध हे त्यांच्या भाषेचे गुण आहेत. विविध व्यक्ती आणि प्रसंग यातून उपहास, नर्म विनोद आणि नाट्यात्मकतेचा गुणही सोनकांबळे यांच्या भाषेला लाभला आहे.

बोलीभाषा, सांस्कृतिक परिभाषा कशी असते, याचे प्रत्यंतर या आत्मकथनाच्या भाषेच्या अभ्यासाने येते. तसेच या बोलीने तळागाळाच्या जीवनाचा शोध आकलून घेता येतो.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

तसेच अक्करमाशीतील भाषेसंबंधी स्वत: शरणकुमार लिंबाळे लिहितात - ''अक्करमाशीतील भाषा प्रमाणभाषा असती तर - प्रमाणभाषा मला माझे अनुभवविश्व शब्दात मांडण्यासाठी अपुरी वाटली. त्याचप्रमाणे बोलीभाषा देखील तोकडी ठरते. कोणाला अक्करमाशी ही फक्त बोलीभाषेत लिहायला हवी होती असे वाटते. या पुस्तकात बोलीभाषा आहे, प्रमाणभाषा आहे, काव्यमय भाषाही आहे. दलित साहित्यामुळे प्रमाणभाषेला काही नवीन शब्द मिळतील अशी माझी धारणा आहे.''[४] या निवेदनाने असे अधोरेखित केले आहे की, मराठी भाषेत अनेक नवीन शब्दांची भर दलित साहित्याने घातली आहे.

उदा. ''माय कुंतीवानी गप्प रहायची. अशावेळी मला कर्ण जवळचा वाटायचा. कैकदा म्याच कर्ण व्हायचो.'' (पृष्ठ ४९) महाभारत महाकाव्यांचा सांस्कृतिक प्रभाव झिरपत झिरपत दलितांच्या मनावर परिणाम करतो याचे हे उत्तम उदाहरण. जिव्हाळ्याच्या विषयात ही भाषा असे कलात्मकतेचे अप्रतिम रूप घेताना दिसते. ''पान्यापरिस कोण स्वच्छ हाय. वरले पानवठे पोटात रिचत होते. पोटात मातून पानवठा गदगदून आला.'' (पृष्ठ ६) उपेक्षित जीवनाची शब्दातील घृणा अल्पाक्षरात व्यक्त करण्याची ताकद येथे दिसते. तसेच ''आमच्या पोटात कावळ्यांची झुंबड उडायची, पंक्तीत वाढपी वरडायचे. आमी कान देऊन ऐकायचो. आमचं पोट कानात येयाचं पोट पंगत व्हायाचं. पोट कढई व्हायाचं.'' (पृष्ठ ६) या लेखनात काव्यात्मता आहे. काव्यात्म भाषा हेही 'अक्करमाशी' या आत्मकथनाचे एक लक्षवेधक अंग आहे. वास्तविक यात दारिद्र्याचे, अपमानाचे, उपेक्षेचे चित्रण आहे. पण ते शब्दबंबाळ न करता काव्यात्म अशा अल्प शब्दांत प्रभावीपणे मांडले आहे. वास्तवातील कारूण्याची अस्वस्थ करणारी व्यथा आहे. शेणातील दाणे दळत असतानाचे वर्णन करताना ही भाषा अशीच लयदार होते. ''तिचा गोड आवाज आणि जात्याची घर्रघर्र एकात एक मिसळून जायचा.''

तर 'कोल्हाट्याचं पोर' पुस्तकातील भाषेचा विचार केला तर ती अक्करमाशीप्रमाणे बोलीभाषेत ते निवेदन नाही. प्रमाणभाषेतून निवेदन करून आवश्यक तेथे संवाद मात्र बोलीतून टिपलेले आहेत. आत्मनिवेदनात प्रमाण भाषा वापरली आहे.

उदा. 'माझं डोकं म्हणजे एक पोकळी झाली होती. शेणातले किडे शेणाला पोखरून जसे भुगा करतात तसं माझं डोकं विचारानं पोखरलं होतं. सगळीकडे अंधार पडला होता पण तशाही अवस्थेत मी प्रकाशाचा रस्ता शोधण्याचा प्रयत्न करीत होतो.' (पृष्ठ ११२) विचार, चिंतन आणि विवेक यातून मार्ग काढताना किशोर काळे यांचा मन:संघर्ष त्यांना व्याकुळ करताना दिसतो.

विद्रोह आणि क्रांतिकारक विचार किशोर काळे यांच्या व्यक्तिमत्त्वाला कृतिप्रवण करण्यास कसे ध्येयवादी करत असत याचे हे उदाहरण आहे.

''चिता ही माणसाला मेल्यावर जाळते त्यामुळे माणूस जळून कायमचा नाहीसा तरी होतो. पण चिंता ही माणसाला जिवंत असताना जाळून मारते.'' (पृष्ठ ७) प्रत्यक्ष जीवनातील अनुभव आणि साहित्यसंस्कार यातून किशोर काळे यांची निवेदन शैली वाक्प्रचारांनी युक्त झाली आहे.

स्वत:चा पराकोटीचा मन:संघर्ष आविष्कृत करण्यास लेखकाने अशा प्रचलित वाक्प्रचाराचाही आधार घेतला आहे.

दोन्ही आत्मकथनांची शीर्षके बोलीभाषेतून साकार झालेली आहेत. स्वचे अस्तित्वदर्शक व जातिदर्शक असे या शीर्षकातून अर्थ व्यक्त होतात. दोन्ही शीर्षके सामाजिकता व सांस्कृतिकतेची निदर्शक आहेत. त्यातील 'अक्करमाशी' हे शीर्षक लज्जा व मनोवेदनांचे तीव्र निदर्शक आहे.

**बोलीभाषा :** व्यक्तीच्या स्वभावाशी संवादी असणाऱ्या बोलीचा त्यांचा साहित्यावर मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडलेला दिसतो. त्यात भावनात्मक उत्कटता, उद्रेक, उपरोध व कारूण्यस्पर्शी काव्यात्मताही भेदक होते.

उदा. ''कडूसं दिवे लागण धिऊन येयाची. घासलेट नसलेली चिमणी क्षयाच्या रोग्यावानी जळायची. उंदीर जीव धिऊन डोळ्याआड व्हायचा. कुत्र पिळून टाकलेल्या कापडावानी दारात पडलेलं असायचं.'' (पृष्ठ ८) ''महारवाडा म्हंजे इसाव्याच्या जवारीचा ढीग.'' (पृष्ठ १०) ''इथं पानीच पाण्याला वैरी हुतं.'' (पृष्ठ १६) किंवा भूकेचे वर्णन करताना ''भाकर माणसाएवढी आभाळाएवढी भाकर सूर्याएवढी प्रखर, भूख माणसापेक्षाही दांडगं. एक पोट म्हंजी पृथ्वी. पोट असतं हितभर पर सारं जग मिळून ढेकर दील.'' (पृष्ठ ४१) त्याशिवाय लेखकाच्या आत्मकथनात महारी बोलीचा जास्त प्रभाव दिसतो. दारिद्र्य, भूक,

सामाजिक विषमता आणि सुखदायी कल्पना बोली भाषेतून व्यक्त होत नाही. भाषा मूळ सौंदर्यासहित पुढे येते.

उदा. १०-१२ वर्षाचा होईपर्यंत हगाय पाणी नेलं नाही. (पृष्ठ १०-१२)

भाषेच्या या प्रत्ययकारिकतेमुळे लिंबाळे ह्यांच्या आयुष्याची व्यथा वाचकांच्या मनाची प्रचंड घालमेल करण्यास समर्थ ठरते. सुप्रसिद्ध कवी विंदा करंदीकर यांनी शरणकुमार लिंबाळे यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे "तुम्ही जे भोगले व जे भावले ते तुम्ही समर्थपणे टिपले आहे. बोलीभाषा व संस्कारीभाषा यांचे अक्करमाशी मिश्रण आणि गद्यवृत्ती व काव्यवृत्तीत वेळोवेळी झालेला संकर हा आपल्या अनुभवाच्या अभिव्यक्तीला पूरक ठरलेला आढळला."[५] हा गौरव यथोचित म्हणावा लागेल.

लेखकांच्या विविध भाषिक शैली त्यांच्या सामाजिकतेशी निगडीत आहेत. बिनभिकारी, गुडसा, उरसांड शब्दप्रयोगांनी स्वकथनातील आशयद्रव्याची सामाजिकता प्रगट केली. त्यामुळे लेखकाच्या सभोवतीचा जो समाज असले त्या समाजाच्या बोलीभाषेच्या योजनेमुळे त्या समाजातील रूढी, श्रद्धा, अज्ञान या साऱ्यांचे संदर्भ या बोलींना लाभले आहेत. लेखकावर शिक्षण सुशिक्षित नागर समाजाचे जे संस्कार झाले त्यामुळे त्यांची मूळ बोली आणि ग्रांथिक भाषा यांचे मिश्र रूप या स्वकथनात आढळते. परिणामी स्वकथनातील ही भाषाशैली आशयद्रव्याशी वास्तवदर्शनाच्या सूत्राने बांधलेली आढळून येते.

'अक्करमाशी'तील भाषेवर कर्नाटकी भाषेचा प्रभाव आहे तर 'कोल्हाट्याचं पोर'मधील बोली संवाद हा लेखकाच्या वास्तवानुभूतीला अनुसरून लिहिलेला आहे.

उदा. नानांनी एवढा त्रास देऊनही किशोरची आई म्हणते "किशोर तुझ्या पाया पडते असं काही करू देऊ नको. माझ्या कुंकवाची इज्जत वाचव. तू पोलिसांना खोटं बोल." (पृष्ठ ११५) "नाचणारीणनं नंतर काय करावं ? हे अंगावरच्या कपड्यासारखं झालं, आज नवीन कपडा घातला, खराब झाला की दुसऱ्या दिवशी फेकून पण नाचणारीण ही अंगावरचा कपडा नाही की जोपर्यंत वापरावा वाटला तोपर्यंत वापरायचा आणि नंतर टाकून द्यायचा !" (पृष्ठ १६) येथे शांताबाईची अस्मिता जागृत झालेली दिसते. माणूसपण फणा काढून उभारताना दिसते. भाषा काव्यात्म असल्याने भेदक झाली आहे.

फुलांचा वास जोपर्यंत येतो तोपर्यंत त्यांचा वास घेतात अन् टाकून देतात. (पृष्ठ १७) ''दीपक तीन वर्षाचा झाला तरी आईला पितच होता. पित्या वासराला गायीपासून दूर केल्यासारखं दीपक आईपासनं दूर झाला.'' (पृष्ठ २२) ''आई आमचे एवढे लाड करू लागली की गाय दिवसभर शेतात चरून, हंबरडा फोडतच संध्याकाळी घरी पळत येते आणि दूध काढते. वेळेस वासरू दूध पीत असताना त्याला किती चाटून चाटून प्रेम करते.'' (पृष्ठ २५)

''कुसुममावशी संजयसाठी रात्रंदिवस रडत होती. गाय वासराची ताटातूट झाली होती आणि वासरू इकडे झुरत होतं.'' (पृष्ठ ३४) गाय-वासराची प्रतिमा प्रतीके किशोर काळे माय-लेकारासाठी वेळोवेळी वापरतात.

''आडकित्यात सुपारी जशी सापडते तसं आईचं जीवन झालं होतं.'' (पृष्ठ ७६) अशा अनेक प्रसंगातून बोलीचे विभ्रम पहावयास मिळतात. व्यक्तीला सुंदर दिसण्यासाठी जसा साज चढवावा लागतो. त्याप्रमाणे भाषेतील मतीतार्थ प्रभावी करण्यासाठी भाषेला साज चढवलेला दिसतो. याचप्रमाणे ग्रामीण बोली त्या-त्या समाजाची वेगवेगळी आहे. याची देखील प्रचिती येते.

उदा. ''अगं ये शांते, तुझं पोरगं माझ्याजवळ हाय. ए मी चालले त्याला घेऊन. आता कशी नेरल्याला येत नाहीस ते बघतो मी.''

'मेल्या तू माझ्या पोरीचं वाटुळं केलं माझ्या घरातली लक्ष्मी घेऊन गेलास. अन् लाज नाय वाटत लेकराला बी घेऊन चालला.' (पृष्ठ २२) ''लेका किश्या तुझी आई फार हुशार होती, आज ती मास्तरीण म्हणून राहिली असती. पण बिचारीचं नशीबच फुटकं होतं.'' (पृष्ठ २६) ''मायचा, बायची भाडी खाऊन आयती झाल्यात आळसल्यागत.'' (पृष्ठ ३०)

जिजी म्हणाली, ''तुझ्या रंभामावशीचा मालक हाय. ईमानात नौकरीला हाय बघ, लय पैसेवाला हाय.''

''माझं डोकं म्हणजे एक पोकळी झाली होती. शेणातले किडे शेणाला पोखरूण जसे भुगा करतात तसं माझं डोकं विचारानं पोखरलं होतं. सगळीकडे अंधार पडला होता, पण तशाही अवस्थेत मी प्रकाशाचा रस्ता शोधण्याचा प्रयत्न करीत होतो.'' (पृष्ठ ११२)

लेखक सांगतात समाजाची जशी अवस्था होती त्याचप्रमाणे लेखकाची सुद्धा कोंडी होती. म्हणजे लेखक समाजाचे प्रतिनिधित्वच करतो.

'अक्करमाशी' या आत्मकथनामध्ये आलेली महारी भाषा आहे. त्याचप्रमाणे 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनामध्ये कोल्हाटी समाजाच्या भाषेचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर झालेला दिसतो. दोन्ही आत्मकथेमध्ये काही अंशी साम्ये दिसतात. तर खाणं-पिणं, राहणं-बोलणं यामध्ये फरक प्रकर्षाने जाणवतो.

या आत्मकथनात ग्रामीण बोलीतील संवादाचे प्राबल्य जास्त जाणवते. तसेच कोल्हाटी समाजावर सवर्णांच्या भाषेचा पगडा मोठ्या प्रमाणात जाणवतो.

**प्रादेशिक भाषा :-**

विशिष्ट प्रदेशात प्रधान प्रमाण भाषेचे बोलीरूप वैशिष्टपूर्ण असते. तिला प्रादेशिक भाषा असे म्हटले जाते. भौगोलिक स्थिती, सीमा, प्रदेश, इतिहास, परंपरा यांचा बोलीवर प्रभाव असतो. लोकांची सोईनुसार बोलीभाषा असते. भाषा ही प्रत्येक १५ मैलांवर बदलते. म्हणजेच प्रत्येक व्यक्तीची समाज, गाव, देश, जात व लिंग यानुसार भाषिक व्यवहार चालतो. म्हणजेच मनुष्याचा प्रदेशवार भाषा व्यवहार चालतो. 'अक्करमाशी' या आत्मकथनातील भाषेवर कर्नाटक प्रांतातील कन्नड भाषेचा प्रभाव दिसतो. कारण कर्नाटक सीमेवरील लेखकाचे गाव आहे. तर 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनातील कोल्हाटी समाजाच्या बोलीवर हिंदी भाषेचा ठसा उमटलेला दिसतो. या भाषेचे अपभ्रंश रूपच या आत्मकथनात येते. मुस्लीम वळणाचे बोली रूप संवादातून आढळते.

"किसऱ्या हमारा संजू कडे हाय ? (आमचा संजू कुठे आहे ?)" मी म्हणालो, "हरिनानांनी उसकू दुकानको दुपरी को लिए गया था अजून ओ आयाच नाही." मी असं म्हणल्याबरोबर संजयचा मोठा मामा ओरडला.

"सत्यानास हुया ये, हाऱ्या को छोरे को मुंबई के लिए गये ये ।" (पृष्ठ ३५) "ये किसऱ्या, किसकी कार हाय." मी म्हणायचो "मेरी" (पृष्ठ ३६) "अब परसावर जिजी क्या रूट्या लीय जा अण मामा कु लगाय दे."

"इने बिबीका चिरा उतऱ्या." "कजे बरोबर जा भावकी के आदमी कब

भरके को'' ''कितने दिन कजे की बाट दिखनेवाली हाय.'' ''दारू कु कुडासे पैसे लाये.'' (पृष्ठ ६६) ''आम्हाला हाळजलं कशाला आमचा सांभाळ करता येत नाही तर ?'' (पृष्ठ ७३)

लेखकाला व त्यांच्या भावाला सांभाळण्याबद्दल जेव्हा तक्रार निर्माण झाली तेव्हा वरील उद्‌गार काढलेत. व्यक्तीला परिस्थितीसमोर पूर्णपणे हतबल जीवन जगावे लागते. नैराश्येला कवटाळावे लागते.

''तू चिकणा है, इधर क्यूँ आया यहाँसे निकल जा.'' ''मालिक मैं कही नही जाऊँगी मेरी गलती है, मैनेही किशोर को बोला था. उसे मत मारो.'' (पृष्ठ ७८) ''का छोरा हाय कजेने (नानाने) बल्या चल की उठ्या, कितना डरताय छोरा.'' ''उसकू मालूम हाय नेरले मे रहिसन का होणेवाला हाय. कुते की मौतीवानी मारण्या का. सोनपेठको जाईसन एक तरी मरी जाण्या का. (पृष्ठ ७९) नाही तर निका शिकसीन माॅ कु सुख देने का.'' ''मऱ्या ये छोरा नहटो काई तरी.''

किशोर शांताबाई काळे यांच्या 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनातील भाषेवर मुसलमानी (हिंदी) व कोल्हाटी समाजाची भाषा यांचा संकर झालेला दिसतो. मिश्र भाषा आणि अपभ्रंषाचा संस्कार ''कोल्हाट्याचं पोर'' मध्ये अधिक जाणवतो. याशिवाय या आत्मकथनात कोल्हाटी समाजातील म्हणी व शिव्या ही आहेत. ग्रामीण बोली व खालच्या समाजातील शिवराळ संवाद आणि भाषेचे अपभ्रंश रूप यामुळे कोल्हाटी समाजाचे एक बिभत्स वास्तव या आत्मकथनात उभे राहते.

''मायचा, बायची भाडी खाऊन आयती झाल्यात आळसल्यागत''. (पृष्ठ ३०) ''ती रांड तुला इथं सोडून गार बसली आपल्या याराजवळ.'' (पृष्ठ ४४) लेखकाला आजोळी सोडून शांताबाई गेल्याने त्यांना सर्वांचा त्रास सहन करावा लागतो. त्यावेळी त्यांची आईबद्दल मावशी त्रागा करते. ''मुड्या, भाड्या, तुझं चांगलं होणार नाही. माझ्या पोरीला पळवून आला. माय लेकराची ताटातूट केली.'' (पृष्ठ २१) मानवी जीवनात ज्या दैनंदिन गोष्टी असतात त्याला म्हणीच्या रूपात मांडलेले दिसते. ''रोज मरे त्याला कोण रडे !'' (पृष्ठ ५५) ''जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही.'' ''बडा घर पोकळ वासा'', ''इकडे

आड तिकडे विहिर'' अशा म्हणी आलेल्या आहेत. ज्याला जन्मजात जी सवय जडलेली असते ती मरणानंतरच संपते. ती पूर्वी सुटत नाही. तसाच वाक्प्रचार देखील आलेला आहे.

''पाणी मुरणे'' (पृष्ठ ११३) अशी प्रत्येकाची एक जीवन जगण्याची लकब असते. यामध्ये कधी प्रेमाने तर कधी त्वेषाने भाषाव्यवहार केलेला दिसतो. शिवाय वेळप्रसंगी अश्लील शिव्या सहजपणे वापरलेल्या आहेत. ती त्यांच्या जगण्या वागण्याची सहज स्वाभाविक रीतच असते.

किशोर काळे या आत्मकथनकाराचा बालपणापासून सज्ञानपणापर्यंतचा काळ जास्तीत जास्त स्त्रियांच्या सहवासात गेला. स्त्रियांच्या बोलीत म्हणी व वाक्प्रचार अधिक असतात. लेखकाच्या भाषाशैलीवर हा संस्कार विशेषत्वाने जाणवतो.

तसेच व्यक्तिवर्णने, प्रसंगवर्णने, स्थलवर्णने देखील अतिशय प्रभावी आहेत. त्यापैकी लाल्या, जिजी, निली, संजयची आई, कुसुम अशा व्यक्तिरेखा आल्या आहेत.

उदा. लाल्या हा बेवारशी होता. त्याला बायको-मुलं नव्हती. तो पार्टीत काम करायचा, बायांसारखा बोलायचा. पार्टीची सर्व कामं करायचा. पार्टी बघायला आलेली माणसं त्याची चेष्टा करायची. ''अगं बया, इकडे येकी मला मुका दे.'' लाल्या तृतीयपंथी (हिजडा) होता. त्याच्याशी त्या नात्याने अवतीभोवतीचे लोक वागत-बोलत. तमाश्याशी निगडीत जगणाऱ्या लोकांना अशा व्यक्तींच्या व्यवहाराचा सराव झालेला असतो. हे वास्तव 'कोल्हाट्याचं पोर' मध्ये उमटलेले आहे. लाल्या म्हणायचा, ''जाऊ द्या बया. तुम्हाला दुसरा धंदाच नाही.'' मी त्याला खूप हसायचो. तयाच्या चड्डीला पकडून खाली खेचायचो. लाल्या मोठ्यानं बोंबलायचा आणि जिजीला सांगायचा. (पृष्ठ १९)

स्थलवर्णन, प्रसंगवर्णन देखील वैशिष्ट्यपूर्ण झालेली आहेत. उदा. झोपडपट्टीतील काही माणसं पळापळ करीत होती. काही लोकांना पोलीस बेदम मारीत होते. गूळ भिजू घातलेले मटके फोडत होते. माझ्याकडे पोलीस येऊ लागले असं पाहताच मी पळायला सुरूवात केली. पण पोलीसांनी मला पकडलं. परसात झोपडीतल्या माणसांनी मटक्यात गूळ भिजू घातला होता. तो पोलिसांना

सापडल्यामुळे त्यांनी मला बेदम मार द्यायला सुरूवात केली. कारण त्यांना वाटलं, मी झोपडपट्टीतलाच मुलगा असावा. (पृष्ठ २८) खालच्या वर्गातील लोकांनी पोट भरण्यासाठी कलेले बेकायदेशरी धंदे पोलिसांच्या धाडीत मोडीत निघतात. धरपकड, मारहाण ओघाने येते. अशा अनेक प्रसंगाचे व स्थळांचे वर्णन 'अक्करमाशी' व 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनात आलेले आहे.

उदा. सोनपेट, सोलापूर, आंबेजोगाई, चुंगी अशा ठिकाणांचे चित्रण ठिकठिकाणी आले आहे.

घटना - प्रसंग - स्थल वर्णनात प्रादेशिकता येते. तशा भाषेच्या लकबीही येतात.

कोणत्याही वाङ्मयाकृतीच्या कलात्मकतेचे स्वरूप हे त्यातील आशय आणि अभिव्यक्ती यातील नाविन्याच्या कसोटीवर तपासून पाहिले जाते. एखाद्या कलाकृतीचा आशय हा तिच्या भाषाशैलीचे स्वरूप निश्चित करतो. आशय आणि अभिव्यक्ती यातील नाविन्यपूर्ण मांडणीमुळे एक नवे साहित्यरूप प्रत्ययाला येते. दलित आत्मकथनातील नवा आशय मांडण्यासाठी वास्तवाला अनुसरून भाषाशैली स्वीकारणे या लेखकांना आवश्यक वाटलेली आहे.

दलित स्वकथनांमध्ये प्रामुख्याने लक्षात येणारी गोष्ट म्हणजे ही आत्मकथने लेखकांचे वास्तव्य असलेल्या प्रदेशाच्या बोलीभाषेतून लिहिलेली आढळतात. याची प्रचिती, 'अक्करमाशी' व 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनामधूनही येते. भाषेचा समाज व्यवहाराशी, समाजाच्या आचार विचारांशी व नीती नियमांशी घनिष्ट संबंध असतो. भाषेच्या स्तरावर भाषेच्या वापरावर सांस्कृतिक मूल्य ठरते. जमातीच्या संस्कृतीची ओळख भाषेमुळेच होते.

या आत्मकथनांमध्ये त्यांचा समाज व भाषा यांचे नाते अतूट असल्याचे दिसते. जेवढ्या जाती-जमाती तेवढ्यांच्या वेगवेगळ्या बोलीभाषा असतात आणि त्यांच्या सांस्कृतिक रीती-रिवाजांचे संस्कार त्यांच्या बोलीभाषेवर झालेला आढळतो. बहुधा दलित लेखकांची भाषारूपे सामाजिक जाणीवेशी निगडीत असल्याचे आढळते. याशिवाय 'अक्करमाशी' व 'कोल्हाट्याचं पोर' मध्ये आलेले मनोरंजनात्मक खेळदेखील ग्रामीण भागातील आहेत.

उदा. जुगार, मटका इत्यादी जीवन उद्ध्वस्त करणारे छंदही त्यांच्या जीवनात सर्रास असतात. तर लहाणपणी जिबल्या, लंगडी-फुगडी, नवरा-बायकोचा खेळ लेखक शेजारच्या मुलींबरोबर खेळत असे. (पृष्ठ ६२)

त्या अनुभवांना समाजाने घेऊन दलित मनात असणाऱ्या आशा, आकांक्षा, मनिषा समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तर सर्व वनस्पतींमधून वेगळा वाटणारा निवडुंग जसा बाजूला फेकला जातो त्याप्रमाणे समाजाने या मागासलेल्या लोकांना दूर न लोटता त्यांना व त्यांच्या दु:खांना समजून घेतले पाहिजे. निसर्गातील सौंदर्य वाढवण्यासाठी निवडुंगाचे काहीतरी स्थान आहे. त्याप्रमाणे दलित म्हणवला जाणारा व्यक्ती-कुटुंब-समाज हाही एक विश्वाचा घटक आहे हे लक्षात घेतले तर हे उपेक्षित लोक तुम्हा-आम्हांपासून अलिप्त राहणार नाहीत. त्यांच्याही जीवनाचा विकास साधला जाईल. मूलभूत गरजाच भागत नाहीत म्हणून त्यांच्या जीवनात जो जीवघेणा संघर्ष त्यांना करावा लागतो तो करावा लागणार नाही.

'अक्करमाशी' व 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनांची भाषाशैली लेखकाच्या बोलीतून आणि त्याच्या जिल्ह्याची प्रादेशिक भाषेतून व्यक्त झालेली आढळते. आजअखेर लिहिलेल्या आत्मकथनकारांनी आपल्या वैयक्तिक जीवनात वापरलेल्या बोलीभाषेतून लेखन केलेले आहे. याचे उदाहरण म्हणजे 'मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे' ही माधव कोंडविलकरांनी लिहिलेली दैनंदिनी परंतु खरीखुरी वास्तवानुभूती होय. प्रौढ व सुसंस्कारित भाषेतील संवाद यामुळे स्वकथनाला कलात्मकता प्राप्त झाली आहे. 'जवाच्या व तवाच्या पोल्या', 'गरम्यास अब्रू नाय', 'थंडीत अब्रू हाय', 'सू तिकडं धागा', 'खायला तेवडा थोडा हंगल तेवढ मॉप' इत्यादी वाक्प्रचार तसेच 'मनरिनी', 'रांड', 'रसगल', 'पावनेर', 'धानवडा', 'लाँव', 'सोरगत' इत्यादी शब्द संग्रहित होतात. ''अक्करमाशी'' आत्मकथनाच्या परिशिष्टात कठिण शब्दांचे अर्थ देऊन दलितेतर बहुसंख्य वाचकांची चांगली सोय केलेली आहे.

'आठवणींचे पक्षी' मध्ये प्र.ई. सोनकांबळे यांनी आठवणींचे माध्यम वापरून आपले लेखन केलेले आहे. मराठवाड्यातील अस्सल महारी भाषा त्यांनी वापरली. कारण ती भाषा लेखकाची जीवनभाषा आहे. मराठवाड्यातील उदगीर

या भागातील खास महार बोलीचे परिमाण लाभल्यामुळे त्यांचे आत्मकथन वास्तव आणि जिवंत वाटते. लेखक जसजसा शहरी जीवनाकडे जातो तसतशी त्याची भाषा प्रमाणभाषेच्या रूपात आल्याचे जाणवते. उपरोधिकपणा आणि तिरकसपणा हे त्यांच्या भाषेचे गुण आहेत. प्र.ई. सोनकांबळे यांच्या आत्मकथनातील विविध व्यक्ती आणि प्रसंग यातून उपहास, नर्म विनोद आणि नाट्यात्मतेचा गुणही त्यांच्या भाषेला लाभलेला दिसतो. ही त्यांची महारी बोली मराठवाड्यातील उस्मानाबादी. अस्पृश्यांच्या जीवनाशी निगडीत असल्यामुळे त्यात अनोळखी शब्द येतात.

उदा. बिदवा, कुपाटी, मुर्दाड, चान्या, डल्या, लाकोशी, सागोती, वंजळ इत्यादी शब्दांप्रमाणेच उर्दू भाषेचा प्रभाव दर्शविणारे हुन्नेरी, फरार, हवस, कदर, कुडता, लेबास इत्यादी शब्दही त्यांच्या निवेदनात येतात.

या आत्मकथनातून लेखकाने बोलीभाषेचा वेगळा सूर कसा असतो आणि ती सांस्कृतिक परिभाषा कशी असते तसेच या बोलीने तळागाळाच्या जीवनाचा शोध कसा घेता येतो हे दर्शविले आहे.

तर 'उपरा' या लक्ष्मण मानेंच्या स्वकथनामध्ये भाषेची तीन रूपे आढळतात. कैकाडी, ग्रामीण व व्याकरणशुद्ध नागरीभाषा असे भाषेचे तीन पदर 'उपरा'त एकत्र असल्यामुळे बोलीचा जिवंतपणा कैकाड्यांचे जीवन यथार्थपणे घडविण्यात उपयुक्त ठरला आहे. या बोलीभाषेचे मोठेपण सांगताना प्रा. रा.ग. जाधव लिहितात - ''जगणे मोलाचे आहेच पण त्या मोलाची मौलिकता प्रत्ययास आणून देणारी शब्दासारखी दुसरी शक्ती नाही, नसावी. शब्दांनी उपेक्षित असलेले सगळे काही शून्यातच राहते. कैकाडी समाजासारखा दलित समूह हा आजवर शब्दब्रह्मानेच उपेक्षित राखला होता. शब्दांनी उपेक्षा केली की त्या समूहाची सांस्कृतिक उपेक्षा ठरलेलीच असते. एका दृष्टीने संस्कृती म्हणजे शब्दच. माने यांनी स्वतःला व स्वतःच्या कैकाडी समाजाला आजवर नाकारलेला शब्द पहिल्यांदा बहाल केला.''[६] कैकाडी समाजातील म्हणी, वाक्प्रचार व उखाणे इत्यादींमुळे बोलीच्या आंतरिक सौंदर्याची लय जाणवते. संवादातून बरेचदा ग्राम्यतेच्या पातळीवरचे शिव्याशापही भरपूर वापरले आहेत. याचे कारण लोकजीवन व मानवी जीवनातील राग-लोभादी भावनांचे प्रगटीकरण करण्यासाठी


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

तशी भाषा वापरली आहे. ''मनात आलेली उर्मी वड्याच्या पाण्यावानी ओसरून जायची.'' किंवा ''रात अंधराच्या उन्हात बुडली व्हती.'' यासारखी वाक्ये उपराचे वाङ्मयीन सौंदर्य वाढवितात. तसेच सनांग, येशान, तुणी, येणा, खन्नी, काळळं, उरसांड, इरड, मोगान, पेनसुन्या इ. शब्दही प्रादेशिक भाषेच्या सौंदर्याचे स्वरूप व्यक्त करतात.

असाच काहीसा प्रकार तुषार भाग्यवंतांच्या 'कोंडाळं' व पांडुरंग जाधव यांच्या 'म्हारूडा', लक्ष्मण गायकवाड यांच्या 'उचल्या', आत्माराम राठोडच्या 'तांडा' संबंधीही घडलेला आहे. तुषार भाग्यवंतांनी 'कोंडाळं' मधून महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील, तसेच सावंतवाडी परिसरातील महार समाजाचे जीवन चित्रण करताना ग्रांथिक मराठीचाच उपयोग केलेला आहे. क्वचित ठिकाणी बोलीचा वापर केलेला आहे.

स्वकथनाच्या बोलीच मूळ भाषेला समृद्ध करतात आणि बोलीमुळेच भाषेचे शब्द भांडार वाढते. दलित लेखकांच्या स्वकथनांची भाषाशैली सामाजिक जाणिवेशी निगडित असते.

**स्त्रीजीवन चित्रणातील भाषिक विशेष**

''अक्करमाशी'' मध्ये अश्लिल व अर्वाच्य शब्दप्रयोग अनेक आढळतात. विवाहबाह्य स्त्री-पुरूष संबंधाचे संदर्भही येतात. भूक आणि भाकरीभोवती फिरणारी समस्या सामुहिक आणि वैयक्तिक अशा दोन्ही वर्तुळात अस्वस्थ, बेचैन व निर्लज्ज करणारी आहे. महारी बोलीतून अन्नान्न दशेचे वर्णन येते. ते संस्कृतीशी एकरूप होऊन येते म्हणून वास्तव व भेदक झाले आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांबाबतीत भूकेकंगाल भणंग बकालपणाच या आत्मकथनात भरून राहिला आहे.

शरणकुमार लिंबाळेचे लग्न होईपर्यंत त्यांना 'अस्पृश्यता' आणि 'अक्करमाशी' पण सामान्य माणूसपणापासून व प्रतिष्ठेपासून दूर हाकलताना दिसते. लेखकाला काकाने जी महाभारत, रामायण, हरिविजय वगैरे ग्रंथसंपदा वाचायला दिली त्यामुळे त्याच्या भाषेत त्यातील प्रतिमा-प्रतीके स्वाभाविकतेने आली आहेत. तसेच लेखक जे बकाल वास्तव जीणे जगतो त्या जगण्यातूनही काही शब्दप्रयोग सहजतेने येतात. उदा. ''म्या वाढत व्हतो कर्णासारखा. महाभारतभर.'' ''आम्ही

जात चोरून रहात होतो. आमचं घर मला लाक्षागृहासारखं वाटत होतं.'' ''येक माय अन् दुसरी धरणीच कुठल्याबी गोष्टीला पोटात घेतात.'' ''आता गूळ मिळाला. परच्या-पत्ती न्हौती. परत येक अडचण आडवी आली. लेकरू आडवं आल्यावानी.''

दादाच्या हमालीवर शरणकुमार, संतामायचं पोट भरायचं. लेखक लिहितो - ''पर कवा कवा मोटारी रिकामी येयाच्या. रिकामी जायाच्या. गर्भपातानंतर पोट संभाळल्यावानी आमी आमच्या आशा संभाळीत बसायचो. थंड चूल, रिकामी दुर्डी, हमाली नसलेली बस काळीज कातरायची.''

''अक्करमाशी''तील निवेदन अनेक ठिकाणी काव्यात्म बनलेले आहे. त्यामुळे ते अधिक भेदक आणि परिणामकारक झालेले आहे.

उदा. ''डोळ्यातल्या पान्याला किती कासरा घालावा ? भूकेला किती रवंथ करावं ? नांगराला जुपल्यासारखं स्वतःच जीवनाला जुपून घ्यावं लागतं. पाटातून वाहणारं झुळूझुळू पानी पोटात येक अस्वस्थ घामाचा थेंब होऊन वाहत असतं.''

''पान्यावर लाटा लाटा आल्या. मनात वाटा वाटा झाल्या. लाजेला भीतीचा काटा आला.''

स्त्री-पुरूष संबंधाविषयी, जन्माविषयी, गर्भाविषयी, अंधश्रद्ध घटना-प्रसंगाच्या वर्णनात, सवर्णांच्या बळजोरीविषयी 'अक्करमाशी' मधील भाषास्वरूप हिडीस, अभद्र, अर्वाच्य व शिवराळ झालेले आढळते. तुलनेत 'कोल्हाट्याचं पोर' मधील भाषा मध्यमवर्गीय स्वरूपाची आहे. मूलभूत गरजांच्या उपलब्धीसाठी व्यक्तिगत किंवा सामूहिक स्वरूपाची परवड, फरपट व बकालकंगाली नाही.

''कोल्हाट्याचं पोर'' मध्ये स्त्रीजीवनाच्या चित्रणात आणखी एक विशेषत्वाने जाणवणारी बाब म्हणजे लेखकाने वापरलेल्या उपमा.

उदा. ''आडकित्त्यात सुपारी जशी सापडते तसं आईचं जीवन झालं होतं.'' एखादी स्त्री चवचाल (वाईट चालीची) असते. सगळ्या नसतात, हे सांगण्यासाठी मीनामावशी म्हणते - ''एका आंब्याला कीड लागली की, आपल्याला वाटत सगळ्या आंब्याल कीड लागली आहे काय ? पण सगही फळं किडकी नसतात.'' स्त्री तरूण असेपर्यंतच तिला जवळ केले जाते. तिचा उपभोग घेतला जातो. नंतर तिला दूर केले जाते. हे सांगण्यासाठी - ''फुलांचा जोपर्यंत वास येतो तोपर्यंत ती वापरतात. जेव्हा वास संपतो त्यावेळी फेकून देतात.''

"हरिनानानं गाय-वासराला जवळ केलं हा गुन्हा होता का ? आई लेकराला एकत्र आणलं म्हणजे पाप केलं का ?" - असे लेखक विचारतो.

नाना वडकरची रखेल म्हणून राहिलेली शांताबाई काळे भांडणात संतापून म्हणते, "आधी माझं सगळं करा आणि मग दुसरीकडं जाऊन चाटा. मी काय तुमच्या मागे लागून आले काय ? तुमच्यासारख्या माणसाला रोज ताजं माल खाण्याची सवय असेल पण मी त्या बायांपैकी नाही ........"

लक्ष्मी साळीचं वर्णन करताना लेखक लिहितो - "बाजूलाच दोन्ही पाखरं होती. जणू कोंबडी पिलाचं पंखाखाली संरक्षण करीत होती. ................ कोल्हाट्याला सोन्याची अंडी देणारी कोंबडी जाऊ द्यायची नव्हती."

"पोपटाला जसं पिंजऱ्यात बंद करून ठेवतात तसंच आईल आणि तिच्या विचारांना घरात बंद करून ठेवलं होतं. पिंजऱ्यातल्या पोपटासारखी आई झुरत होती."

आपल्या सुस्वरूप सुशीलामावशीबद्दल किशोर काळे लिहितात - "जणू काही आकाशातली परी धरतीवर उतरली आहे."

"पित्या वासराला गायीपासून दूर केल्यासारखं दीपक आईपासून दूर झाला." आईचे दूध आठ वर्षांचा होईपर्यंत पिणारा भाऊ आईपासून दुरावल्याविषयी लेखक असे लिहितो.

लेखकाच्या बेबीमावशी विषयी चहाटाळ बदफैली तरूण म्हणतात - "काय कवळी काकडी आहे. काय चिकना माल दिसतो. आयला पण झोपूच देत नाही. हिला उचलून घेऊन गेलं पाहिजे."

लेखकाची कस्तुरीमावशी मास्तरीण असूनही कोल्हाट्याची म्हणून तमाशात नाचावे लागते. त्याविषयी लेखक दुःख व्यक्त करताना लिहितो - "गावची मास्तरीण नाचते म्हणजे गावच्या लोकांनादेखील वाटत होतं की, गावच्या इज्जतीला धोका लागला. गावची इज्जत गावोगावी नाचत आहे या कोल्हाट्यांना मात्र आनंद वाटत होता. मनातल्या मनात दिवाळीच्या फटाकड्या वाजत होत्या. कारण त्यांच्या इज्जतीची आत्महत्या झाली होती."

फूल, गाय, माल, कोंबडी - सोन्याची अंडी देणारी कोंबडी, पिंजऱ्यातला पोपट, परी, कवळी काकडी, चिकना माल, इज्जत इ. प्रतिमा स्त्रीसाठी या आत्मकथनात वापरलेल्या दिसतात. स्त्रीचा नाजुकपणा, गरीबपणा, उपयुक्तपणा,

बंदिनीची स्थिती, अलौकिक सौंदर्य, लाघवीपणा, उत्तेजक रूप, प्रतिष्ठेचे प्रतीक अशा विविध गुणात्मकतेसाठी अशा प्रतिमा वापरलेल्या आढळतात. त्यातून कोल्हाटी स्त्रीजीवन व संस्कृती प्रतीत होते. यावरून दोन्ही आत्मकथनातील भाषिक विशेष भिन्न स्वरूपाचे असून मराठी साहित्यात त्यांनी भाषिक विशेषांचे योगदान दिलेले आहे, हेच दिसून येते.

'अक्करमाशी' आणि 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनांचा भाषिक विशेषांचा अभ्यास करताना जाणवते की अक्करमाशीवर कर्नाटकी महारी भाषेचा प्रभाव दिसतो. कर्नाटकी महारी म्हणजे सीमा प्रदेशाची महारी भाषा लेखक सोलापूरला शिक्षणासाठी जाईपर्यंत वापरलेली आहे. तर 'कोल्हाट्याचं पोर' या आत्मकथनावर कोल्हाटी समाजाच्या आणि हिंदी अपभ्रंश भाषेचा प्रभाव दिसतो.

म्हणजेच सर्वच स्वकथने आपला विचार मांडताना समाजमानसाच्या सुखदु:खाचा विचार मांडतात म्हणून ती प्रातिनिधिक ठरतात. परिस्थिती विरूद्ध आवाज उठवतात. तोदेखील त्या परिसरातील बोलीच्या माध्यमातून असल्यामुळे वास्तव व प्रभावी ठरतो. कोणत्याही लेखकाची जीवनगाथा ज्या समाजाच्या पार्श्वभूमीवर घडते त्यासमाजाच्या संस्कृतीसहीत बोलीतून जिवंतपणे उमटते. म्हणून बोली संस्कृतीचे प्रतिबिंब ठरते. कोणतेही दलित आत्मकथन पूर्णत: व्यक्तिगत नसते. ते परिसरासहित उमटलेले समूहचित्र असते म्हणून ते प्रातिनिधिक असते. ''अक्करमाशी'' आणि ''कोल्हाट्याचं पोर'' ही दोन्ही आत्मकथने भाषिक वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहेत. विशिष्ट समाज, विशिष्ट प्रदेश आणि विशिष्ट जीवनशैलीनुसार या आत्मकथनांचे भाषिक विशेष आढळतात.

**निष्कर्ष -**

१) प्रत्येक जातीधर्माची वैशिष्ट्यपूर्ण अशी बोलीभाषा असते.

२) 'अक्करमाशी' आणि 'कोल्हाट्याचं पोर' मध्ये आपापल्या समाज बोलीचा वापर केलेला आहे.

३) 'अक्करमाशी' आत्मकथनावर कानडी भाषेचा प्रभाव दिसतो.

४) 'अक्करमाशी' मध्ये महारी भाषा तर 'कोल्हाट्याचं पोर' मध्ये कोल्हाटी भाषा वापरली आहे.

५) 'कोल्हाट्याचं पोर' च्या भाषेवर हिंदी, प्रादेशिक भाषेचा प्रभाव पडलेला आहे.

६) 'अक्करमाशी' व 'कोल्हाट्याचं पोर' मधील समाज व बोली यांचे नाते अतूट असल्याचे दिसते.

७) 'अक्करमाशी'तील लेखकांना समाजात अखेरपर्यंत 'अक्करमाशा' हीच उपाधी देण्यात आली.

८) दलित लिहू लागल्यामुळे मराठी साहित्य अधिक पुष्ट, प्रातिनिधिक आणि वास्तव झाल्याचे दिसून येते.

तात्पर्य, 'अक्करमाशी' व 'कोल्हाट्याचं पोर' ही दोन्ही आत्मकथने प्रथमपुरूषी एकवचनी आत्मनिवेदन स्वरूपाची असली तरी आशय आणि अभिव्यक्तीमध्ये अनेक व्यक्तिचित्रणे आली आहेत. संवाद-प्रसंग आले आहेत. त्यामध्ये म्हणी, वाक्प्रचार, विशिष्ट शब्दप्रयोग आलेले आहेत. भाषेसंबंधी व साहित्यनिर्मितीसंबंधी श्री. म. माटे यांनी मांडलेल्या मताचे प्रत्यंतर आजच्या दलित साहित्याचे भाषिक स्वरूप देत आहे.

## संदर्भसूची

१) श्री.म. माटे - भाषावृद्धीची सामाजिक दृष्टी, पृ.क्र. ७६.

२) नागनाथ कोत्तापल्ले - ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८५, पृ.क्र. ५९.

३) रा.ग. जाधव - दलित आत्मकथेतील समृद्ध भाषेचा प्रवास, अस्मितादर्श - औरंगाबाद, दिवाळी अंक १९८३, पृ.क्र. ११४.

४) शरणकुमार लिंबाळे - 'बखर एका अक्करमाशीची' अबकडई, ग्रंथाली प्रकाशन, १९८६, पृ.क्र. १५२.

५) तत्रैव, पृ.क्र. १५२.

६) रा.ग. जाधव - निळी क्षितिजे, अस्मितादर्श - औरंगाबाद, १९८३, पृ.क्र. ९७.